“Free communities to Open Defecation Free nation-Fast Tracking ODF South East Asia” या विषयावर कंबोडिया येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहण्यासाठी डॉ.कादंबरी बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना परवानगी देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः जिपअ-२०१७/प्र.क्र.५८/आस्था-४

बांधकाम भवन, तिसरा मजला, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: १३, नोव्हेंबर,२०१७

संदर्भ:-

१) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११,दि.२९.१२.२०१४.**

२) **विभागीय आयुक्त, नागपूर विभागीय कार्यालय यांचे दि.६.११.२०१७ रोजीचे पत्र.**

आदेश:-

युनिसेफ व Community-Led Total Sanitation (CLTS) फाऊंडेशन कोलकता यांच्या संयुक्त विद्यमाने, “Free communities to Open Defecation Free nation-Fast Tracking ODF South East Asia” या विषयावर नाम पेन्ह,कंबोडिया येथे दि.१५-१७ नोव्हेंबर,२०१७ या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिषदेकरिता CLTS Foundation यांचेकडून डॉ.कादंबरी बलकवडे,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना नामनिर्देशित करण्यात आल्याचे संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये विभागीय आयुक्त,नागपूर यांनी कळविले होते. त्यास अनुसरून डॉ.बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर यांना सदर आंतरराष्ट्रीय कार्यशाळेस उपस्थित राहण्याबाबत परवानगी देण्याबाबत शासनास विनंती केली होती.

प्रस्तुत परिषदेचे प्रयोजन शाश्वत विकासांच्या अनुषंगाने निर्धारित करण्यात आलेल्या दशलक्षी उद्दीष्टांपैकी (Millenium Development Goals) महत्वाचे असलेल्या सार्वत्रिक स्वच्छता (Universal Sanitation) या विषयाबाबत जागरूकता असून, सन २०३० पर्यंत उघड्यावरील शौचालयास (Open Defecation Free) प्रतिबंध करण्याबाबतची आव्हाने तसेच त्याबाबतचा Road Map व कृती कार्यक्रम ठरविणे असा आहे. परिषदेचे आयोजन केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतील Open Defecation Free या अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत असून, ग्रामस्तरावर याबाबत जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांचेकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येते. सदर दौऱ्यामुळे राज्य शासनास निश्चितच फायदा होईल. याबाबींचा विचार करून संदर्भ क्र.१ अन्वये मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत छाननी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून डॉ.कादंबरी बलकवडे,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना विदेश दौऱ्यास परवानगी देण्यात येत आहे.-

१. सदर विदेश दौऱ्यास राज्य शासनाच्या मंजूरीनंतर केंद्र शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक राहिल.केंद्र शासनाची मान्यता शासन परिपत्रक संदर्भ क्र.१ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार घेण्यात आलेली आहे.
२. डॉ.बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर यांना विदेश दौऱ्याच्या कालावधीत फॉरेन कॉन्ट्रीब्यूशेन (रेग्युलेशन) ॲक्ट, २०१० मधील तरतूदीनुसार विदेशी आतिथ्य स्विकारण्यावर बंधन असेल.
३. दौरा पूर्ण झाल्यानंतर तीन आठवड्याच्या कालावधीत सदर दौऱ्याचा विस्तृत अहवाल केंद्रीय वित्त मंत्रालयाचा आर्थिक व्यवहार विभाग, सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन व ग्राम विकास विभागास सादर करणे आवश्यक असेल.
४. आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत प्राप्त अनुभवाचा फायदा विभागातील अन्य कर्मचारी यांना होण्याच्या दृष्टिने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करतील.

सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाने अनौ. संदर्भ क्र. २११/२०१७/११ दि. १०/११/२०१७, अन्वये दिलेल्या परवानगीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११३१५१२२५२१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Girish Dinkar Bhalerao

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca8fd093b771c4573a3a57cff525280d3134f0f7af228e47d44bd71716c64fc3, cn=Girish Dinkar Bhalerao
Date: 2017.11.13 15:56:54 +05'30'

(गिरीष भालेराव)
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा.मंत्री,ग्रामविकास यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन.
५. अप्पर मुख्य सचिव,सेवा ,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,जी.टी.हॉस्पीटल,मुंबई.
८. सचिव,ग्रामविकास व पंचायतराज विभाग,मुंबई.
९. विभागीय आयुक्त,नागपूर विभाग,नागपूर.
१०.डॉ.कादंबरी बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नागपूर.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१२. उप सचिव,ग्रामविकास व जलसंधारण विभाग.
१३. निवड नस्ती (कार्या.-आस्था-४)